Volume-2 (2021)
Special Issue-1
RESEARCH HUB
International Peer-Reviewed Multi-Disciplinary E-Journal
Website : www.researchhub.org.in/research-hub !! Email : researchhubjournal@gmail.com

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे धर्मविषयक विचार

**डॉ. गजानन बापुराव ठाकरे**
मंगलधाम हुडको कॉलनी
मंगरुळपीर जिल्हा वाशीम

विसाव्या शतकातील ज्या काही नेत्यांनी संपूर्ण जगाला आपल्या कार्याने प्रभावित केले त्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्थान फार मोठे आहे. डॉ. बाबासाहेब यांनी आपले संपूर्ण जीवन समाजातील उपेक्षित वर्गाला अधिकार प्राप्त करून देण्यासाठी, त्यांना मानव म्हणून सन्मानित जीवनाचा दर्जा मिळवून देण्यासाठी, समाजातील प्रचलित धार्मिक व जातीभेदाची दरी कमी करण्यासाठी समर्पित केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना त्यांच्या जीवन काळात धार्मिक अनिष्ट रूढीचा सामना करावा लागला. त्यांना अनेक वेळा धार्मिक अनिष्ट रूढी मुळे अपमानित व्हावे लागले. धार्मिक कर्मकांडामुळे आपल्या बांधवांना मानव म्हणून जगण्याच्या अधिकारापासून वंचित व्हावे लागत आहे हे त्यांच्या लक्षात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आयुष्यात सतत धर्म हा विषय महत्त्वाचा ठरला आहे. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे धर्माविषयक विचार लक्षात घेणे अत्यंत आवश्यक आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे :-**

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे धर्माविषयक विचार अभ्यासणे.

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बौद्ध व हिंदू धर्माविषयक विचारांचा तुलनात्मक अभ्यास करणे.

३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या धर्मविषयक सुधारणांचा अभ्यास करणे.

**धर्मासंबंधी विचार व विविध व्याख्या : -**

साधारणपणे धर्मात ईश्वर, निसर्गातील विविध शक्ती, मानवाने अंगीकारण्याचे धार्मिक आचरण, मानव व ईश्वर यांच्यातील परस्परसंबंध या सर्व बाबींचा विचार धर्मात केला जातो. जवळजवळ सृष्टीनिर्मिती नंतरच्या काही वर्षापासून मानवी जीवनात धर्माला अत्यंत महत्त्वाचे स्थान असल्याचे दिसून येते. मानव आपल्या आशा-आकांक्षा आपले ध्येय प्राप्त करून घेण्यासाठी आपल्या धार्मिक परमेश्वराला प्रसन्न करण्याचा प्रयत्न करतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांच्या धर्म चिंतनात 'धर्म आणि धम्म' असा फरक केला आहे. ईश्वराला प्रसन्न करण्यासाठी केलेले धार्मिक आचरण याला त्यांनी 'धर्म' हे नाव दिले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'धम्म' व 'धर्म' या दोन संज्ञेत तफावत दर्शवली आहे. त्यांच्या मते 'वैयक्तिक व सामाजिक नीती म्हणजे धम्म होय'. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ईश्वराच्या तुलनेत वैयक्तिक व सामाजिक आचरणाला अधिक महत्त्व दिले आहे.

हिंदू धार्मिक ग्रंथानुसार ज्यामुळे समाजाची धारणा होते तो धर्म होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांच्या धम्म या संकल्पनेत धर्माचा हा अर्थ मान्य केल्याचे दिसून येते. ते म्हणतात "समाजाच्या धारणेकरिता घातलेली बंधने म्हणजे धर्म ही माझी देखील कल्पना आहे. ही व्याख्या वास्तविकदृष्ट्या अथवा तार्किकदृष्ट्या योग्य दिसली, तरी समाजाच्या धारणेकरिता समाजाची बंधने कशाप्रकारची असावीत त्या प्रश्नाचा या व्याख्येवरून काहीच बोध होऊ शकत नाही". हा आक्षेप डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घेतला होता. खऱ्या धर्माच्या स्वरूपाचा विचार करताना समाज व व्यक्ती यांचे संबंध कसे असावे हा प्रश्न निर्माण होतो. समाज व व्यक्ती यांच्या संबंधाचा विचार

RESEARCH HUB
International Peer-Reviewed Multi-Disciplinary E-Journal
Website : www.researchhub.org.in/research-hub !! Email : researchhubjournal@gmail.com

स्पष्ट करताना आधुनिक समाजशास्त्रज्ञांनी पुढील प्रमाणे विविध मते व्यक्त केली आहेत. काही समाजशास्त्रज्ञांच्या मते समाजातील व्यक्तीच्या इच्छा-आकांक्षा पूर्ण व्हाव्यात त्यांना सुखप्राप्ती व्हावी हा समाजसंघटनेचा हेतू आहे. काही समाजशास्त्रज्ञांच्या मतानुसार वैयक्तिक सुखप्राप्तीच्या तुलनेत व्यक्तीची प्रगती लक्षात घेणे जास्त महत्त्वाचे आहे. काही तत्वज्ञांच्या मते समाजसंघटनेचा हेतू व्यक्तीची सुखप्राप्ती अथवा त्याची प्रगती नसून 'आदर्श समाज' तयार करणे हा आहे. पण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना ही विचारसरणी मान्य नव्हती. त्यांच्या मते , ''व्यक्तीच्या जीवनाला समाजाची जरी आवश्यकता असली ; तरी समाजाची धारणा हे धर्माचे एकमेव ध्येय होऊ शकत नाही. व्यक्तीचा विकास हेच धर्माचे खरे ध्येय आहे. व्यक्तीच्या आत्मोन्नतीला पोषक असे वातावरण उत्पन्न करणे ही धर्माची मूलभूत कल्पना आहे. समता व स्वातंत्र्य या होत. ही मूल्ये ज्या धर्मामध्ये असतील तोच धर्म श्रेष्ठ होय''. अशी धर्मविषयक भूमिका डॉ. आंबेडकर यांनी स्पष्ट केली आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे हिंदू धर्म विषयक विचार :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हिंदू धर्माची शास्त्रशुद्ध चिकित्सा केली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सातत्याने हिंदुधर्मातील कर्मकांडाला विरोध केला आहे. त्यांच्या मते हिंदू धर्मात व्यक्तीच्या तुलनेत जाती तथा वर्गरचनेला अधिक महत्त्व दिल्या गेले आहे. त्यांनी हिंदू धर्मातील दोष स्पष्ट करताना धर्माची तुलना एका इमारतीशी केली आहे. हिंदू धर्म हा एका इमारतीसारखा आहे. या इमारतीला चार मजले आहेत. प्रत्येक मजल्यावरील लोकांची कार्य स्पष्ट आहेत. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शुद्र अशी ती चार मजले आहेत. वरच्या मजल्यातील व्यक्ती ते कार्य करण्यास पात्र असो वा नसो त्या व्यक्तीला ते कार्य करण्यास पात्र समजले जाते. उलटपक्षी खालच्या मजल्यावरील व्यक्ती कितीही विद्वान व पात्र असली तरीही वरच्या वर्गाची कार्य करण्यास ती पात्र समजली जात नाही. अशा प्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नेहमीच हिंदू धर्मातील जाती रचनेला वर्गरचनेला विरोध केला आहे. ते म्हणतात, " एका माणसाने दुसऱ्याशी कसे वागावे याची शिकवण हिंदू धर्मात नाही. एका वर्गाने विद्या शिकावी, दुसऱ्या वर्गाने शस्त्र धारण करावे, तिसऱ्या वर्गाने व्यापार करावा व चौथ्याने नुसती सेवा करावी: अशी या धर्माने कर्तव्याची विभागणी केली आहे. ती अन्यायकारक आहे. विद्या, शस्त्रे आणि पैसा याची प्रत्येक माणसाला जरुरी असते. ही गोष्ट जो धर्म विसरतो आणि जो एकाला सज्ञान करण्याकरिता बाकीच्यांना अज्ञान ठेवतो तो धर्म नसून लोकांना बौद्धिक गुलामगिरीत ठेवण्याचा कावा आहे. जो धर्म एकाच्या हाती शस्त्र देतो व दुसऱ्याला नि:शस्त्र करतो; जो धर्म काहींना धनसंपादनाच मार्ग मोकळा ठेवतो व बाकीच्यांना आपली उपजीविका दुसऱ्यावर अवलंबून राहण्याची अनुज्ञा देतो तो धर्म नसून, ती स्वार्थपरायणता आहे." हिंदू धर्मातील तत्कालीन वर्गरचना वरिष्ठ वर्गांना कनिष्ठ वर्गावर अन्याय करण्याची जणू काही परवानगी देते असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मत होते. हिंदू धर्मातील जे वरिष्ठ तीन वर्ण शूद्र या कनिष्ठ वर्णाचे शोषण करीत होते त्याबद्दल त्यांनी नेहमीच आपला रोष व्यक्त केला होता. शुद्र वर्णाला मिळणाऱ्या अन्यायकारक वर्तणुकीचा व सामाजिक गुलामगिरीचा त्यांनी सातत्याने विरोध करून शुद्र वर्गातील लोकांना शोषणाविरुद्ध लढण्यास प्रवृत्त केले.

हिंदू धर्मातील मानवता नाकारणाऱ्या समाजव्यवस्थेला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तीव्र विरोध केला. हा धर्म व त्या धर्माने मान्य केलेली जातीव्यवस्था, अस्पृश्यता, वर्णव्यवस्था व्यवस्था समाजातील उपेक्षित वर्गाला सामाजिक, राजकीय, आर्थिक हक्क तर सोडा, पण माणूस म्हणून जगण्याचा हक्क देखील नाकारत होती. समाजातील एका फार मोठ्या वर्गाला अडगळीत टाकण्याची व तमाम मानवी हक्क हिरावून घेण्याची भूमिका तत्कालीन धर्म व समाजरचनेने घेतली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची हिंदुत्वाबद्दल ची परखड भूमिका

त्यांच्या पुढील विचारातून व्यक्त होते. ते म्हणतात, "हिंदूत्व ही फॅसिझम किंवा नाझीझमप्रमाणे एक राजकीय विचारप्रणाली आहे. ती संपूर्णपणे व्यवस्था सर्व लोकशाही विरोधी आहे. हिंदुत्वाला मोकळे रान सोडले (आणि ते म्हणजे हिंदू बहुसंख्यत्व) तर जे हिंदू धर्माच्या बाहेर आहेत व त्याला विरोधी आहेत त्यांच्या वाढीला एक अडसर आहे. हा दृष्टीकोन केवळ मुस्लीमाचाच नाही तर दलित आणि ब्राह्मणेतरांचा देखील हाच दृष्टीकोन आहे. एकंदरीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते, हिंदुत्व ही एक राजकीय विचारप्रणाली आहे तिचे स्वरूप व वंशवादी आहे ती संपूर्णपणे लोकशाहीविरोधी आहे, हिंदुत्वाचा प्रसार व वाढ म्हणजे इतर धार्मिक गटांची पीछेहाट होणे होणे होय, मग ते हिंदूबाह्य गट असोत, की हिंदूविरोधी, हा दृष्टीकोन केवळ मुस्लिमांचाच नसून दलित आणि ब्राह्मणेतर यांचेही तेच मत आहे. डॉ. आंबेडकर यांनी जहाल हिंदु तत्वज्ञानाचा सातत्याने विरोध केला.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा धर्म आणि धम्म या विषयीचा दृष्टीकोन :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हिंदू धर्मावर कठोर टीका करताना धम्म श्रेष्ठता देखील वर्णिली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्म आणि धम्म यातील फरक सूक्ष्म असल्याचे दर्शविले आहे. त्यांनी त्यांच्या 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' या पुस्तकात बऱ्याच ठिकाणी धम्म या शब्दाला उद्देशून धर्म हा शब्द वापरला आहे. डॉ. आंबेडकर यांनी बुद्धिझम हा सर्वश्रेष्ठ धर्म आहे, तद्वतच तो एक श्रेष्ठ सामाजिक सिद्धांत आहे. बहुतेक पाश्चात्यांच्या मते ईश्वर हा कोणत्याही धर्माच्या केंद्रस्थानी असणे अभिप्रेत आहे. या ईश्वर शास्त्रज्ञांच्या दृष्टिकोनातून ईश्वराला मानणारा धर्म म्हणजेच धर्म होय. त्यामुळे मानव हा केंद्रस्थान मानणारा बुद्धिझम हा धर्म नाही असे त्यांचे मत होते. पण काही धार्मिक विचारवंताच्या मते 'निरिश्वरवादी' धर्म असू शकतो. डॉ. आंबेडकर यांनी धर्म आणि धम्म यातील दर्शवलेला फरक म्हणजे ईश्वरशास्त्रज्ञ धर्माला वैयक्तिक बाब समजतात. पण धम्म ही वैयक्तिक बाब समजणे धम्माच्या मूलभूत स्वरूपाची विसंगत आहे. ईश्वराला केंद्रस्थान मानणाऱ्या धर्मात व्यक्ती सुखप्राप्तीसाठी पूजन करतो. माणसांमधील परस्परसंबंध दुय्यम असतात. याउलट धम्मात परमेश्वर, परब्रह्म या बाबींना दुय्यम स्थान असते किंवा या गोष्टींना नाकारले सुद्धा जाते. तर मानावामधील प्रेमाचे, मैत्रीचे परस्परसंबंध केंद्रस्थानी असतात. मुळातच भगवान बुद्धांनी ईश्वर ही गोष्ट नाकारली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देखील हे तत्त्व मान्य केले आहे. 'धम्म म्हणजे नीती' हे त्यांनी स्पष्ट केले आहे. ईश्वरवादी धर्मात नितीचे समर्थन करण्यासाठी देखील ईश्वर सहाय्यभूत ठरतो, तर धम्मात नितीचे समर्थन ईश्वरवादाच्या आधाराने केले जात नाही. तर नीतीचा मानवी कल्याणाची प्रत्यक्ष संबंध जुळतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर धम्माचे वेगळेपण स्पष्ट करताना म्हणतात, धर्म केवळ नैतिकतेचा मार्ग नव्हे, तर त्यात नैतिकतेला एक पवित्र व सार्वभौम मूल्य मानलेले असते. धर्म आणि धम्म यातील तफावत स्पष्ट करताना ते पुढे म्हणतात, ईश्वरकेंद्री धर्मात श्रद्धावादाला वाव असेल, तर मानव केंद्रीय धर्मात बुद्धीवादाला महत्त्व आहे. या बुद्धीवादातच न्याय बुद्धी व सत्यशोधी वृत्ती समाविष्ट असतात. मानवकेंद्री धर्मात नीती व न्याय यांचा स्वीकार व अनीती व अन्यायाला विरोध या बाबी अंतर्भूत आहेत. बुद्धिझम हा धर्म नसून धम्म आहे. असे डॉ. आंबेडकरांचे मत होते.

**डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार करण्याची कारणमीमांसा : –**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हिंदू तसेच इतर धर्माचा सखोल अभ्यास केला हिंदू धर्मातील जातीव्यवस्था, वर्गरचना, अस्पृश्यता अशा अनिष्ट बाबीमुळे डॉ. आंबेडकर तथा समाज बांधवांना उपेक्षितांचे जीवन जगावे लागले. प्रचलित धर्मात समाज बांधवांना न्याय मिळणार नाही हे लक्षात आल्यानंतर त्यांनी धर्मांतराचा निर्णय घेतला. सर्वच

धर्माचा अभ्यास केल्यानंतर त्यांनी ईश्वरवादी धर्माचा त्याग करून जगाला शांतीचा संदेश देणारा निरीश्वरवादी, मानवातील परस्परसंबंधला केंद्रस्थानी मांडणाऱ्या बौद्ध धर्माचा स्वीकार केला.

बौद्ध धर्म हा ईश्वरवादाला थारा देत नाही. तद्वतच या धर्मात जातीभेद, वर्णभेद या बाबींना महत्त्व देत नाही. ईश्वर हा सृष्टीचा निर्माणकर्ता आहे असे हा धर्म मानीत नाही. हे विश्व स्वयंभू आहे. ते कार्यकारण भावाच्या नियमाप्रमाणे चालते. या विश्वाचे नियंत्रण करण्यासाठी कोणत्याही अदृश्य शक्तीची आवश्यकता नाही. असे गौतम बुद्धाचे म्हणणे होते. प्रचलित धर्मात शुद्र जाती तथा स्त्रियांना अधिकार दिलेले नव्हते. पण बुद्धांनी ब्राह्मण वर्गाला इतकेच नव्हे तर स्त्रियांनासुद्धा भिक्षु संघात प्रवेश दिला. बौद्ध धर्मात प्रज्ञा, शील, करुणा या तत्त्वांना महत्त्वाचे स्थान आहे. एका माणसाने दुसऱ्या माणसाची कसे वागावे याबद्दल चे नियम सांगितले आहेत. दुःखाचे मूळ कारण मानवाचा लोभ, वासना होय. त्यामुळे मानवाला जर दुःखापासून स्वतःची मुक्तता करावयाची असेल तर त्याने आपल्या वासनेवर विजय मिळविला पाहिजे. भगवान बुद्धाने दु;ख नाहीसे करण्यासाठी अष्टांगमार्ग सांगितला आहे.

जगातील सर्व धर्माचा तुलनात्मक अभ्यास केल्यानंतर बौद्ध धर्म हाच व्यक्तीचा विकास आणि सामाजिक समता यांना पोषक असा धर्म आहे अशी खात्री पटवून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या अनुयायांसह १९५६ साली हिंदू धर्माचा त्याग करून बौद्ध धर्माचा स्वीकार केला.

**निष्कर्ष :-**

एकंदरीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना ईश्वर केंद्रस्थानी असणारा धर्म मान्य नव्हता. याउलट मानवातील परस्परसंबंध केंद्रस्थानी असणारा धम्म त्यांना अभिप्रेत होता. 'त्यांनी धर्म आणि धम्म' या दोन सज्ञेत फारच सूक्ष्म फरक आहे. डॉ. आंबेडकरांनी हिंदू धर्म ग्रंथातील ज्यामुळे समाजाची धारणा होते तो धर्म या व्याख्येचा धर्म या संकल्पनेत स्वीकार केला आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकरांना प्रचलित धर्मातील अनिष्ट रूढीचे चटके वारंवार सहन करावे लागल्याने त्यांनी हिंदू धर्मातील वर्गरचना, वर्णव्यवस्था, जातिभेद, अस्पृश्यता यांचा नेहमीच विरोध केला. माणसा माणसातील संबधांना हिंदू धर्म दुय्यम स्थान देतो असे त्यांचे मत होते. हिंदू धर्मात आपल्या समाज बांधवांना न्याय मिळणार नाही हे लक्षात आल्यानंतर त्यांनी हिंदू धर्माचा त्याग करण्याचा निश्चय केला. जगातील सर्व धर्माचे सखोल अध्ययन केल्यानंतर त्यांनी ईश्वरवादी धर्माचा त्याग करून निरीश्वरवादी तसेच सर्व जगाला शांतीचा संदेश देण्याचा मानव मानवातील परस्परसंबंधांना केंद्रस्थानी आणणाऱ्या बौद्ध धर्माचा स्वीकार केला.

**संदर्भ ग्रंथ : –**

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे खंड[१], – संपादक मा. फ. गजरे
२) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची लेख आणि भाषणे (इंग्रजी) खंड३, शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, 1987
३) 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' (इंग्रजी) – डॉ. भी. रा. आंबेडकर
४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ – संपादक प्रा केशव मेश्राम व इतर प्रकाशक सचिव महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई, मराठी ग्रंथसंग्रहालय मुंबई.
५) डॉ. आंबेडकर धर्मचिंतन – डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ मधील लेख – श्रीमती नलिनी पंडित
६) आंबेडकर नवबौद्धमान – डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ मधील लेख, डॉ. प्रदीप गोखले
७) लोकशाहीला धर्मांतराचे आव्हान व आंबेडकरी विचारसूत्र !– डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ आयु.नागेश चौधरी